महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.१५५/२०२३/जाहिरात दिनांक: १० एप्रिल, २०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : उप संचालक (माहिती), गट-अ, वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी, गट-अ (कनिष्ठ) आणि सहायक संचालक (माहिती) / अधीपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने / माहिती अधिकारी, गट-ब**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक - ०१२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/२०२२**

शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या आस्थापनेवरील उप संचालक (माहिती), गट-अ (जाहिरात क्रमांक १२९/२०२२), वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी, गट-अ (कनिष्ठ) (जाहिरात क्रमांक १३०/२०२२) आणि सहायक संचालक (माहिती) / अधीपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने / माहिती अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३१/२०२२) या संवर्गांच्या पद भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन शैक्षणिक अर्हतेच्या अनुषंगाने शासनाकडून दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ तसेच दिनांक २९ मार्च, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार, खाली नमूद समतुल्य शैक्षणिक अर्हता ग्राह्य समजण्यात येत आहेत:-

| | |
|---|---|
| (1) Bachelor in Journalism and Communication (B. J. C) | (2) Bachelor in Journalism & Mass Communication (B. J. M. C.) |
| (3) Bachelor in Mass Communication | (4) B.A. Mass Communication & Journalism |
| (5) B.A. AND P.G. Diploma in Juurnalism | (6) B.A. AND P.G. Diploma in Mass Communication & Journalism |
| (7) B.A. in Mass Communication | (8) B.A. in Mass Communication & Journalism |
| (9)B.A.in Multimedia and Mass Communication (B.A.M.M.C.) | (10) B.A. in Flim, Television and New Media Produciton |
| (11) B.Voc. in Media Production | (12) B. Voc. Journalism and Mass Communication |
| (13) B.Voc. Media and Journalism | (14) B.Voc. Mass Communication |
| (15) B.Voc. Media Convergence | (16) B.Voc Mass Media |

२. वरीलप्रमाणे शासन अभिप्रायानुसार समतुल्य शैक्षणिक अर्हता ग्राह्य समजण्यात आल्यामुळे, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक १२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/२०२२ या जाहिरतींस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी १४.०० ते दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

३. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन विहित पध्दतीने यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
४. वयोमर्यादा तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभवाचा कालावधी मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.
५. शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क.७६/मावक, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ व दिनांक १३ मार्च, २०२३ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो २०२३/प्र.क्र.४०/१६-अ, दिनांक २३ मार्च, २०२३ नुसार उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याच्या कारणास्तव आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी वैध प्रमाणपत्राचा कालावधी विचारात घेण्यात येईल.
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अनुसार दिनांक १ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
७. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.
८. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक १२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.